**ठळक बातम्या**

- मलावीचा दौरा आटोपून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मायदेशी रवाना

- महाराष्ट्रात महायुती आणि महाविकास आघाडीचं जागावाटप येत्या एक-दोन दिवसांत जाहीर होणार

- झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीचं जागावाटप जाहीर, तर भाजपच्या पहिली यादी प्रसिद्ध

**आणि**

- न्यूझिलंड विरुद्धच्या कसोटी सामन्यात सर्फराज खानच्या दीडशतकाच्या जोरावर दुसऱ्या डावात भारतीय संघ ४६२ धावांवर तंबूत

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आफ्रिकन राष्ट्रातील आपल्या तीन दिवसांचा दौऱा आटपून भारतात परतत आहेत. मलावी विमानतळावर आज त्यांना उपराष्ट्रपती मिशेल बिझवीक यांनी निरोप दिला. यावेळी अनेक उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते. दिल्लीसाठी रवाना होण्यापूर्वी त्यांनी मलावीतल्या सांस्कृतिक स्थळांना भेटी दिल्या. अल्जेरिया, मोरिटानिया आणि मालावी या तीन देशांच्या दौऱ्यात राष्ट्रपतींनी मालावीचे अध्यक्ष लाजरस चकवेरा यांच्याशी द्विपक्षीय मुद्यांवर चर्चा केली. या तीन्ही देशातल्या भारतीय वंशाच्या नागरिकांशी त्यांनी संवाद साधला. भारत आणि मलावीदरम्यान

क्रीडा, युवा, औषधनिर्माण, कला आणि संस्कृती क्षेत्रात सहकार्यासाठी चार सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

<><><><>

शिक्षण क्षेत्रात झालेल्या बाजारीकरणामुळे शिक्षणाच्या दर्जावर विपरीत परिणाम होत असल्याचं प्रतिपादन  उपराष्ट्रपती जगदीप धनखड  यांनी केलं आहे. राजस्थान मधल्या सीकर इथल्या कार्यक्रमात ते बोलत होते. शिक्षण हे कधीच उत्पन्नाचं साधन नव्हतं, तर ते त्यागाचं, परोपकाराचं आणि समाज सक्षम घडवण्याचं माध्यम होतं. शिक्षण क्षेत्राचा व्यवसाय होणं, हे राष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीनं पोषक नसल्याचं धनखड यावेळी म्हणाले.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राष्ट्रीय शिक्षण कर्मयोगी सप्ताहाचं नवी दिल्ली इथं उद्घाटन झालं. राष्ट्रीय शिक्षण सप्ताहात प्रत्येक कर्मयोगी किमान चार तास आपल्या क्षमतेशी निगडित काही नवीन शिकण्याचा कार्यक्रम पूर्ण करेल. राष्ट्रीय शिक्षण सप्ताहात वैयक्तिक नागरिक, विविध मंत्रालयातील विभागातील कर्मचारी आणि इतर संघटनांमध्ये काम करणारे कर्मचारी सहभागी होतील. डिजिटल परिसंस्थेच्या मदतीनं नागरिकांच्या हितासाठी प्रशासकीय यंत्रणा तयार व्हावी आणि कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळावं या उद्देशानं सप्टेंबर २०२० मध्ये कर्मयोगी अभियान सुरू करण्यात आलं.

<><><><>

बदलत्या जागतिक परिस्थितीत भारताच्या लष्कराला भविष्यवेधी ठेवण्यासाठी सरकारने अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि उपयुक्त परिसंस्था

उपलब्ध करून दिली आहे, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयाच्या बासष्टाव्या एम फिल दीक्षांत समारंभात बोलत होते. आताचं युद्ध पूर्वीसारखं केवळ जमीन, पाणी आणि आकाशापुरतंच मर्यादित राहिलं नसून सध्या अशी युद्धं माहिती अर्थात डेटा च्या जोरावर आणि सायबर जग तसंच अवकाशात देखील लढली जात आहेत, असं राजनाथ सिंह म्हणाले.

<><><><><>

भारत आणि मेक्सिको या दोन्ही देशात परस्पर संबध बहुआयामी आणि दृढ होतील, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. मेक्सिको इथं होत असलेल्या ‘भारत-मेक्सिको व्यापार आणि गुंतवणूक शिखर परिषदेत’  त्या बोलत होत्या. मेक्सिको सिटीचे आर्थिक विकास मंत्री मानोला अलदामा हे देखील या परिषदेत सहभागी झाले होते. देशात औषध निर्मिती, उत्पादन, आणि वाहन  क्षेत्रात वाढ होत असून यामध्ये  गुंतवणूक करण्यासाठी मुबलक संधी आहेत, असं अर्थमंत्री यावेळी म्हणाल्या. भारत-मेक्सिको मधली भागीदारी, सीमापार सहकार्य आणि फिनटेक-डिजिटल देय-प्रणाली मधल्या नाविन्यपूर्ण कामांसाठी दोन्ही देशांमध्ये  व्यापक बाजार संधी आहेत, असं त्यांनी म्हटलं.

<><><><><>

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या मोर्चेबांधणीला वेग आला आहे. महायुतीमध्ये केवळ ३०-३५ जागांवर सहमती व्हायची आहे. एक-दोन दिवसात हे जागा वाटप जाहीर होईल अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. नवी दिल्लीत ते

आज वार्ताहरांशी बोलत होते. भाजपाच्या उमेदवारांची यादी लवकरच जाहीर होईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली.

दुसरीकडे, महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नसून तिन्ही पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढणार आहेत, येत्या दोन दिवसांत जागावाटपाची चर्चा पूर्ण होईल, असं काँग्रेस प्रभारी रमेश चेन्निथला यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

दरम्यान, धुळे आणि मालेगावसह राज्यातल्या १२ जागांची मागणी समाजवादी पक्षाने महाविकास आघाडीकडे केली असल्याचं, पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी आज धुळे इथं सांगितलं.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने आज ६६ उमेदवारांची यादी जाहीर केली. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बाबुलाल मरांडी धनवर मतदारसंघातून तर झारखंडचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन हे सराइकेला मतदारसंघातून लढणार आहेत. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीच्या जागावाटपाचं सूत्र निश्चित झालं आहे. झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेस ७० जागा लढवणार आहेत. झारखंड मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष हेमंत सोरेन यांनी रांची इथं प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. ७० जागांचं पक्षनिहाय जागावाटप लवकरच निश्चित केलं जाईल. ११ जागा राजद आणि मार्क्सवादी-लेनिनवादी कम्युनिस्ट पक्ष लढवणार आहे, पक्षनिहाय उमेदवारांची यादी तयार असून ती लवकरच जाहीर करण्यात येईल, असंही सोरेन यांनी सांगितलं.

**<><><><><>**

झारखंडचे प्रभारी पोलीस महासंचालक अनुराग गुप्ता यांना तत्काळ पदावरून हटवण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं झारखंड सरकारला दिले आहेत. मागील निवडणुकीत गुप्ता यांच्याविरुद्ध आयोगाच्या निर्देशांनुसार केलेल्या कारवाईच्या नोंदींच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला.

<><><><><>

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीनं १६ उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली आहे. यात शहादा, साक्री, तुमसर, अर्जुनी मोरगाव, हदगाव, भोकर, कळमनुरी, सिल्लोड, कन्नडमधून, औरंगाबाद पश्चिम, पैठण, महाड, गेवराई, आष्टी, कोरेगाव, कराड दक्षिण या मतदारसंघांचा समावेश आहे.

<><><><><>

भाजपानं केरळमधल्या वायनाड मतदारसंघातून नव्या हरिदास यांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेसकडून प्रियंका गांधी रिंगणात आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यानं इथं पोटनिवडणूक होत आहे.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या नाशिक जिल्ह्यातल्या ८ मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान बंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदानावर सुरु असलेल्या पहिल्या क्रिकेट कसोटीच्या आजच्या दिवसअखेर भारताचा संघ ४६२ धावांवर सर्वबाद झाला. सध्या भारताकडे १०६ धावांची आघाडी आहे. भारताच्या सरफराज खाननं दीडशे धावा झळकवल्या, तर रिषभ पंतचं शतक थोडक्यात हुकलं. सध्या भारताचा संघ कसोटी क्रिकेटच्या क्रमवारीत पहिल्या स्थानावर आहे, तर न्यूझीलंड सहाव्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

नॅशनल कॉन्फरन्सचे ज्येष्ठ नेते मुबारक गुल यांनी आज जम्मू-काश्मीर विधानसभेच्या हंगामी अध्यक्षपदाची शपथ घेतली. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी श्रीनगर इथं राजभवनात झालेल्या समारंभात गुल यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी आणि अन्य कॅबिनेट मंत्री यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

राजधानी दिल्लीतल्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून हवेच्या गुणवत्तेची पातळी ‘खराब’ श्रेणी मध्ये असल्याचं केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं जाहीर केलं आहे. काल राजधानी दिल्लीत हवा गुणवत्ता निर्देशांक २९२ इतका नोंदवला गेला.

**<><><><><>**

भारतीय गहू आणि बाजरी संशोधन संस्था कर्नाल यांनी आज केंद्र सरकारनं मंजूर केलेल्या गव्हाच्या १३ नवीन वाणांच्या बियाणांचं वितरण सुरु केलं आहे. नवीन वाणांचं बियाणं घेण्यासाठी देशभरातल्या २२ हजार

शेतकऱ्यांनी पोर्टलवर नोंदणी केली होती. गव्हाचं नवीन वाण अधिक उत्पादन देण्याबरोबरच रोग प्रतिबंधक आहे. बार्ली वाण DWRV 137 चा देखील गव्हाच्या मान्यताप्राप्त वाणांमध्ये समावेश करण्यात आला आहे. याचा उपयोग जनावरांच्या चाऱ्यातल्या पेंढ्यामध्येही उपयोग करता येईल.

<><><><><>

इस्त्रायलच्या वायुदलानं आज लेबननच्या दक्षिणेकडील बिन्ट जबेईलवर केलेल्या हल्ल्यात हिजबुल्लाचा उपकंमाडर नासर अबेद अलअझीज रशीद ठार झाला. हिजबुल्लानं यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

//<><><><><>//